# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/११/२०१६

**१) बिना पास परवाना अवैधरीत्या रेतीची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०६/११/२०१६ चे २०.३० वा. ते २३.०० वा.दर. यातील जिल्हा खनीजकर्म अधीकारी भंडारा हे आपले स्टॉप सह अवैध गौनखनीजचे उत्तखनन वाहतुक तपासनीसाठी आले असता यातील आरोपी १) फिर्यादी श्रीकृष्ण मोतीराम देवारे यांच्या मालकीचे ट्रॅक्टर क्र. एमएच.३६ एल ६३५३ व ट्रॉली क्र. एमएच ३६ जी २३९१ चा चालक अंगत शेंडे २)सौ.शंकुतंला श्रीकृष्ण देवारे याचे मालकीचे ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ४७१९ व ट्रॉली क्र.एमएच ३६ जी ७७८८ चा चालक गणेश शोभाराव देवगडे ३) श्रीकांत श्रीकृष्ण देवारे ट्रॅक्टर क्र. एमएच.३६ एल ३५०९ ट्रॉली क्र. एमएच ३६ जी ३०५२ चा चालक महेश शरद शेंडे व ट्रक क्र.एमएच ३६ एफ ०६२१ सर्व रा. मुंडरी व तुकाराम मेश्राम वय २८ वर्ष, रा. यांनी संगनमत करून स्वताचे वाहनात बिनापास परवाना ९ ब्रास रेती कि.१८,०००/रू ची चोरून नेतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी देवराम बकाराम मरस्कोल्हे वय ५० वर्ष रा.तलाठी कार्यालय मुंडरी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.फौ.कटरे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**२) बिना पास परवाना अवैधरीत्या रेतीची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०५/११/२०१६ रोजी १०.१५ वा. दर. यातील आरोपी ट्रॅक्टर मालक महींद्रा ४७५ डीआय ट्रॅक्टर चा मालक राजे डोहळे व चालक रवी येळने दोन्ही रा. करडी यांनी संगनमत करून वैनगंगा नदी पात्रातुन शाषनाचे गौन खनीज बिना पास परवाना अवैदयरीत्या आपले ट्रॅक्टर मध्ये १ ब्रॉस रेती कि. २,०००/रू ची चोरून नेल्याने फिर्यादीचे कुमारी किर्ती रमेश अमृते वय २९ वर्ष रा. मोहगाव (तलाठी) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा सलामे पो. स्टे. करडी हे करीत आहेत

**३) अज्ञात मोटार सायकलच्या धडकेत महिला गंभीर जखमी झाल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ७/११/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील जखमी श्रीमती अर्पनाा प्रमोद महाजन वय ३५ वर्ष रा. खात रोड भंडारा ही आपली स्कुटी क्र. एमएच ३६ एस २८०८ ने घराकडे जात असतांना वैशाली नगरचे गेट जवळ टर्न करीत असतांना समोरून येणा–या यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकानी आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने निष्काळजी पणे चालवुन स्कुटीला धडक देवुन तिला जखमी केल्याने जखमी ही डोकरीमारे यांचे दवाखाण्यात औषधउपचारा करीता भरती केले असता प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचााराकरीता नागपुनर येथे रेफर करण्यात आले.डॉ.मेमो व फिर्यादी विनोद नरेद्र भोयर वय ४५ रा.वर्ष रा. राजगोपालचारी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४ गौतम बुध्दाच्या मुर्तीची विटंबना केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०७/११/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील फिर्यादी चंद्रभान कवळु मेश्राम वय ६५ वर्ष, रा. उमरी यांचे घराजवळील रोडाचे बाजुला असलेल्या गौतम बुध्दाच्यामुर्तीचे यातील आरोपीने गळयाला मागे दाबुन मुर्तीची विंटबणा करून फिर्यादीच्या धार्मीक दुखावल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि.नेवारे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे

**५) . अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०७/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, कारधा गोबरवाही ,साकोली, तसेच अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७५ लिटर हातभट्टी दारु कि. ७१००/–रू. व २५ लिटर ५६० मिली लिटर देश दारु कि. ६७२९/–रु. व तसेच जुगारातुन मिळालेला माल कि.६५६ /रू असा एकुण कि. १४,४८५/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

( बि.आर. गाडे )
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत. संगणक कक्ष.** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.